MHYA070024562020

## विशेष दिवाणी दावा क्र. १७/२०२० मध्ये निशाणी क्र.३४ कडील अर्जावर आदेश.

१) प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींतर्फे दाखल केला आहे. प्रतिवादींच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार या न्यायालयाच्या निशाणी क्र. २२ कडील अर्जावरील आदेशानुसार वादीने मौजा लोणी येथील गट क्र. २१२/१, गट क्र. २१७/२, गट क्र. २११/४ या मिळकतीच्या मुल्यावर वेगवेगळा कोर्ट फी आकारुण कोर्ट फी शुल्क दणे आवश्यक होते. परंतु वादीने या तिन्ही शेताचे एकत्रीत मुल्यांकन रुपये १६,१६,०००/– केले असून त्यावर रुपये ३३,६३०/– चा न्याय मुद्रांक शुल्क जोडला आहे. प्रतिवादींच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार गट क्र. २१२/१ या शेताचे मुल्यांकन रुपये ८०,०००/– वर रक्कम रुपये ५,८३०/– चा न्याय मुद्रांक शुल्क व तसेच गट क्र. २१७/२ या शेताचे मुल्यांकन रुपये ५,५३,५००/– वर रुपये १५,६३०/– चा न्याय मुद्रांक शुल्क व गट क्र. २११/४ या शेताचे मुल्यांकन रुपये ९,८२,५००/– वर रुपये २४,२३०/– चा न्याय मुद्रांक शुल्क असा एकुन रुपये ४५,६९०/– चा चा न्याय मुद्रांक शुल्क देणे आवश्यक होते. परंतु वादीने रुपये १२,०६०/– चा न्याय मुद्रांक शुल्क कमी दिला आहे. प्रस्तुत अर्जात अशी विनंती केली आहे की, वादीला रुपये १२,०६०/– चा न्याय मुद्रांक शुल्क जोडण्याबाबत निर्देश देण्यात यावे व वादीने निर्देशाचे पालन न केल्यास दावा खारीज करण्यात यावा.

२) प्रस्तुत अर्जास वादीचे म्हणणे घेण्यात आलेले आहे. वादीतर्फे प्रस्तुत अर्जास निशाणी क्र. ३५ कडे आहे. वादीतर्फे दिलेल्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, गट क्र. २१२/१, गट क्र. २१७/२ व गट क्र. २११/४ या मिळकतीच्या मुल्यांकनाच्या ५० टक्के रक्कमांची एकत्रीत बेरीज करुन त्यावर ३३,६३०/– चा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे व त्यामुळे अर्ज खारीज करण्यात यावा.

३) प्रस्तुत अर्जाच्या कामी प्रतिवादींतर्फे विद्वान वकिल श्री.पी.टी. दर्डा व वादीतर्फे विद्वान वकील श्री.आर.डी. जाधव यांचा युक्तीवाद ऐकला. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

४) प्रतिवादी हे या अर्जाच्या कामी “1970 Mh.L.J. 27, Khoja Alibhai vs. Aminabegum Wakf” व तसेच “1995(2) Mh.L.J. 198, Syndicate Bank vs. M/s. S.S. Printers & Others” या आदरणीय मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायनिवाडयांवर विसंबुन राहीले आहेत. मी उपरोक्त न्यायनिवाडयांचे अवलोकन केले.

५) “1995(2) Mh.L.J. 198, Syndicate Bank vs. M/s. S.S. Printers & Others” या न्यायनिवाडयामध्ये आदरणीय मुंबई उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे मत व्यक्त केले आहे.

“On a plain reading of Section 18 of the Bombay Court Fees Act, it is clear that, the Court Fee is required to be assessed on each subject separately and then the aggregate amount of Court Fee is leviable on the plaint, subject to the

ceiling prescribed in the proviso to article 1, scheduled-I of the Act."

६) दोन्ही पक्षातील विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला असता व रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, प्रतिवादींतर्फे निशाणी क्र. २२ कडे दाखल केलेल्या अर्जावरील आदेशानुसार या न्यायालयाने वादीस असे आदेशीत केले आहे की, वादीने बॉम्बे कोर्ट फी ॲक्ट कलम ६(iv)(ha) मधील तरतुदीनुसार मौजा लोणी येथील गट क्र. २१२/१, गट क्र. २१७/२, गट क्र.२११/४ या मिळकतींच्या मुल्यावर आकारणी होणाऱ्या कोर्ट फीच्या १/२ कोर्ट फी जमा करावी. या न्यायालयाच्या निशाणी क्र. २२ कडील अर्जावरील आदेशाची पुर्तता करुन त्यानुसारचा कोर्ट फी स्टॅम्प दाखल करण्याबाबतची दुरुस्ती निशाणी क्र. १ मध्ये करण्यास परवानगी मिळण्याबाबत वादीने निशाणी क्र. ३३ कडे अर्ज दाखल केला आहे व त्या अर्जावर प्रतिपक्षाचे म्हणणे घेऊन तो अर्ज मंजूर करण्यात आला आहे. वादीने निशाणी क्र. ३३ कडील अर्जामध्ये दावा मिळकत गट क्र. २१२/१ चे मुल्य रुपये १,६०,०००/– नमूद केले असून त्या रक्कमेच्या ५० टक्के रक्कम ही ८०,०००/– रुपये व गट क्र. २१७/२ चे मुल्य ११,०७,०००/– नमूद करुन त्या रक्कमेच्या ५० टक्के रक्कम ही ५,५३,५००/– इतकी नमूद केली आहे व गट क्र. २११/४ चे मुल्य १९,६५,०००/– इतके नमूद केले असून त्या रक्कमेच्या ५० टक्के रक्कम ही रुपये ९,८२,५००/– इतकी नमूद केली आहे व तिन्ही मिळकतीच्या मुल्यांच्या ५० टक्के रक्कमांची बेरीज करुन त्यावर एकत्रीतपणे कोर्ट फी स्टॅम्प रुपये ३३,६३०/– चा जोडला आहे. वादीने निशाणी क्र. ३३ कडील अर्जामध्ये नमूद केलेले दावा मिळकतीचे मुल्य

चुकीचे आहे असे प्रतिवादींचे कथन नाही. प्रतिवादींच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार वादीने तिन्ही मिळकतीच्या मुल्यांकनावर वेगवेगळा कोर्ट फी आकारुन त्या कोर्ट फी ची बेरीज करुन येणारा एकुन कोर्ट फी स्टॅम्प दाखल करणे आवश्यक होते. वादीचा निशाणी क्र. ३३ कडील अर्ज व त्यातील कथानांचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादीने तिन्ही मिळकतीच्या मुल्यांकनावर वेगवेगळी कोर्ट फी आकारुन त्या कोर्ट फी ची बेरीज करुन कोर्ट फी न देता वादीने तिन्ही मिळकतीच्या मुल्यांच्या ५० टक्के रक्क्मांची बेरीज करुन त्यावर एकत्रीतपणे कोर्ट फी आकारला आहे. त्यामुळे उपरोक्त न्यायनिवाडयांमध्ये आदरणीय मुंबई उच्च न्यायालयाने व्यक्त केलेले मत विचारात घेता माझ्या मते वादीने मौजा लोणी येथील गट क्र. २१२/१, गट क्र. २१७/२, गट क्र.२११/४ या मिळकतींच्या मुल्यावर कलम ६(iv)(ha) मधील तरतुदीनुसार वेगवेगळी कोर्ट फी आकारुन त्या कोर्ट फी ची बेरीज करुन कोर्ट फी स्टॅम्प देणे आवश्यक आहे. मौजा लोणी येथील गट क्र. २१२/१ या मिळकतीच्या मुल्याच्या ५० टक्के रक्क्मेवर म्हणजे रुपये ८०,०००/- या रक्कमेवर रुपये ५,८३०/- इतकी ॲडव्हलेरम फी (ad valorem fees) व गट क्र. २१७/२ या मिळकतीच्या मुल्याच्या ५० टक्के रक्क्मेवर म्हणजे रुपये ५,५३,५००/- या रक्कमेवर रुपये १५,६३०/- इतकी ॲडव्हलेरम फी (ad valorem fees) व गट क्र. २११/४ या मिळकतीच्या मुल्याच्या ५० टक्के रक्क्मेवर म्हणजे रुपये ९,८२,५००/- या रक्कमेवर रुपये २४,२३०/- इतकी ॲडव्हलेरम फी (ad valorem fees) अशी एकूण ४५,६९०/- इतकी ॲडव्हलेरम फी (ad valorem fees) देणे आवश्यक आहे. परंतु वादीने मौजा लोणी येथील गट क्र. २१२/१, गट क्र. २१७/२, गट क्र.२११/४ या मिळकतींच्या मुल्यावर कलम ६(iv)(ha) मधील तरतुदीनुसार रुपये

३३,६३०/- चा कोर्ट फी स्टॅम्प दाखल केला आहे. यावरुन असे दिसून येते की, वादीने दिलेला कोर्ट फी स्टॅम्प हा रुपये १२,०६०/- ने कमी / तुटीचा आहे. त्यामुळे वादीला रुपये १२,०६०/- इतका कोर्ट फी स्टॅम्प दाखल करण्याबाबत आदेशीत करणे आवश्यक आहे. सबब, हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आ दे श

१) वादीने रुपये १२,०६०/- इतका तुटीचा कोर्ट फी स्टॅम्प दिनांक ०४/११/२०२२ रोजी पर्यंत जमा करावा.

२) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2022.09.19 17:20:51 +0530

दिनांकः १९/०९/२०२२ (पां.लिं.घुले)

ठिकाणः दारव्हा दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,दारव्हा.

J.O.Code-MH00497